# इयत्ता ११ वी केंद्रीय प्रवेश पध्दती सन २०१०-११
## प्रसिद्धीपत्रक

दिनांकः- १५ जून २०१०

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका व परिसरातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश मागील १५ वर्षापासून केंद्रीय प्रवेश पध्दतीव्दारे देण्यात येतात. यावर्षी देखील (२०१०-२०११) इयत्ता ११ वी चे प्रवेश गुणवत्तेनुसार केंद्रीय प्रवेश पध्दतीने संगणकीय कार्यप्रणालीद्वारे देण्यात येत आहेत. इयत्ता ११ वी प्रवेश पध्दतीच्या नियंत्रण व्यवस्थापनासाठी **फर्ग्युसन महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे ०४** हे मुख्य समन्वय केंद्र राहील. इयत्ता ११ वी प्रवेशाची पूर्ण तयारी झाली आहे. प्रवेश अर्ज विक्री, स्वीकृती बाबतची ठिकाणे, कालावधी व वेळ पुढील प्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज विक्री केंद्र :-**

| अ.क्रं. | कालावधी | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १६/७/२०१० ते दिनांक १९/७/२०१० (रविवार सहित) | स. १०.३० ते सायं ४.०० | पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व शासन मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये |
| २ | दिनांक २०/७/२०१० (फक्त एक दिवस) | स. १०.३० ते सायं ४.०० | फक्त मुख्य प्रवेश केंद्रावर फॉर्म विक्री व स्वीकृती |

**विभागनिहाय प्रवेश अर्ज विक्री उपकेंद्रांची यादी**

| अ.क्रं. | विभाग | उपकेंद्र कनिष्ठ महाविद्यालयांचे नांव |
|---|---|---|
| १ | पुणे शहर | १. सौ. सुंदराबाई राठी मुलींचे क.म.वि., लक्ष्मी रोड, पुणे ३०. |
| २ | कोथरुड कर्वेनगर | २. सौ.विमलाबाई गरवारे हायस्कूल व क.म.वि.,कर्वे रोड, पुणे ४. |
| ३ | पर्वती – धनकवडी | ३. श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, पुणे ९ |
| ४ | कॅम्प येरवडा | ४. एस व्ही युनियन हायस्कूल, व क.म.वि., रास्तापेठ, पुणे ११.<br>५. नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे १.<br>६. गेनबा सोपान मोझे क.म.वि. महाराष्ट्र हौ. बोर्ड, येरवडा पुणे ६. |
| ५ | स्वारगेट हडपसर | ७. आकुताई कल्याणी साधना मुलींचे क.म.वि., हडपसर, पुणे २८. |
| ६ | शिवाजीनगर/औंध/ पाषाण | ८. बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे ४.<br>९. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंधगांव, पुणे ७. |
| ७ | पिंपरी भोसरी | १०. महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी वाघेरे, पुणे १७. |
| ८ | चिंचवड निगडी | ११. फत्तेचंद जैन विद्यालय, चिंचवड, पुणे ३३. |

# इयत्ता ११ वी केंद्रीय प्रवेश पध्दती सन २०१०-११
## प्रसिद्धीपत्रक

**दिनांकः- १५ जून २०१०**

---

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका व परिसरातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश मागील १५ वर्षापासून केंद्रीय प्रवेश पध्दतीव्दारे देण्यात येतात. यावर्षी देखील (२०१०-२०११) इयत्ता ११ वी चे प्रवेश गुणवत्तेनुसार केंद्रीय प्रवेश पध्दतीने संगणकीय कार्यप्रणालीद्वारे देण्यात येत आहेत. इयत्ता ११ वी प्रवेश पध्दतीच्या नियंत्रण व्यवस्थापनासाठी **फर्ग्युसन महाविद्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे ०४** हे मुख्य समन्वय केंद्र राहील. इयत्ता ११ वी प्रवेशाची पूर्ण तयारी झाली आहे. प्रवेश अर्ज विक्री, स्वीकृती बाबतची ठिकाणे, कालावधी व वेळ पुढील प्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज विक्री केंद्र :-**

| अ.क्रं. | कालावधी | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १६/७/२०१० ते दिनांक १९/७/२०१० (रविवार सहित) | स. १०.३० ते सायं ४.०० | पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व शासन मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये |
| २ | दिनांक २०/७/२०१० (फक्त एक दिवस) | स. १०.३० ते सायं ४.०० | फक्त मुख्य प्रवेश केंद्रावर फॉर्म विक्री व स्वीकृती |

**विभागनिहाय प्रवेश अर्ज विक्री उपकेंद्रांची यादी**

| अ.क्रं. | विभाग | उपकेंद्र कनिष्ठ महाविद्यालयांचे नांव |
|---|---|---|
| १ | पुणे शहर | १. सौ. सुंदराबाई राठी मुलींचे क.म.वि., लक्ष्मी रोड, पुणे ३०. |
| २ | कोथरुड कर्वेनगर | २. सौ.विमलाबाई गरवारे हायस्कूल व क.म.वि.,कर्वे रोड, पुणे ४. |
| ३ | पर्वती – धनकवडी | ३. श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पर्वती, पुणे ९ |
| ४ | कॅम्प येरवडा | ४. एस व्ही युनियन हायस्कूल, व क.म.वि., रास्तापेठ, पुणे ११.<br>५. नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे १.<br>६. गेनबा सोपान मोझे क.म.वि. महाराष्ट्र हौ. बोर्ड, येरवडा पुणे ६. |
| ५ | स्वारगेट हडपसर | ७. आकुताई कल्याणी साधना मुलींचे क.म.वि., हडपसर, पुणे २८. |
| ६ | शिवाजीनगर/औंध/ पाषाण | ८. बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे ४.<br>९. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंधगांव, पुणे ७. |
| ७ | पिंपरी भोसरी | १०. महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी वाघेरे, पुणे १७. |
| ८ | चिंचवड निगडी | ११. फत्तेचंद जैन विद्यालय, चिंचवड, पुणे ३३. |

**विभागनिहाय प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्र**

**प्रवेश अर्ज स्वीकृती दिनांक : १६/७/२०१० ते दिनांक २०/७/२०१० (रविवार सह )**

**स्वीकृतीची वेळ : सकाळी १०.३० ते सायं ४.०० वाजेपर्यंत**

| अ.क्रं. | विभाग | स्वीकृती केंद्रे |
|---|---|---|
| १ | पुणे शहर | १. नू. म. वि. मुलांचे विद्यालय, अप्पा बळवंत चौक, पुणे ३०<br>२. आर. सी. एम. गुजराथी (आचार्य डी. बी. दादावाला) ज्युनि कॉलेज, फडके हौद, पुणे ११<br>३. स. प. महाविद्यालय, टिळक रोड, पुणे ३०<br>४. शिवाजी मराठा हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय शुक्रवार पेठ, पुणे २. |
| २ | कोथरुड कर्वेनगर | ५. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे ४.<br>६. शंकरराव मोरे विद्यालय, एरंडवणा, पुणे ३८. |
| ३ | पर्वती – धनकवडी | ७. कर्मवीर भाऊराव पाटील क.म.वि., धनकवडी, पुणे ४३. |
| ४ | कॅम्प येरवडा | ८. पूना कॉलेज, कॅम्प, पुणे १.<br>९. नौरोसजी वाडीया कॉलेज, पुणे १.<br>१०.नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय, येरवडा, पुणे ६. |
| ५ | स्वारगेट हडपसर | ११.रा. रा. शिंदे साधना मुलांचे हायस्कूल व क.म.वि. हडपसर, पुणे २८. |
| ६ | शिवाजीनगर/औंध/ पाषाण | १२.फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ४.<br>१३.मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, पुणे ४.<br>१४.मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे ५.<br>१५. बा.रा. घोलप विद्या. व क.म.वि., सांगवी, पुणे २७.<br>१६. आलेगांवकर हायस्कूल व सी. के गोयल क.म.वि., खडकी, पुणे ३. |
| ७ | पिंपरी भोसरी | १७. नवमहाराष्ट्र विद्यालय, पिंपरी वाघिरे, पुणे १७<br>१८. भैरवनाथ विद्यालय व क.म.वि., भोसरी, पुणे ३९ |
| ८ | चिंचवड निगडी | १९. म्हाळसाकांत विद्यालय व क.म.वि. आकुर्डी, पुणे ४४<br>२०.जैन कन्या प्रशाला, चिंचवड, पुणे ३३ |

**ठळक मुद्दे : -**

१. सर्व प्रवेश संगणकीय प्रणालीद्वारे व गुणवत्तेनुसार केले जात असल्याने प्रवेश अर्ज शहरातील कोणत्याही विक्री केंद्रावरुन विकत घेऊन ते कोणत्याही स्वीकृती केंद्रावर दाखल करता येतील. **प्रवेश अर्ज मिळण्याकरिता अथवा दाखल करण्याकरिता विशिष्ट महाविद्यालयात गर्दी करण्याची आवश्यकता नाही.**

२. सर्व शाखांचे प्रवेश अर्ज द्विभाषिक (मराठी व इंग्रजी) स्वरुपात छापलेले आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या सोयीनुसार दोन्ही पैकी एका भाषेतून प्रवेश अर्ज भरावयाचे आहेत.

३. मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांशिवाय अन्य कोणत्याही ठिकाणी प्रवेश अर्ज मिळणार नाहीत.

४. विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज शुल्क रुपये ५०/- राहील. शाखा / माध्यम निहाय वेगवेगळया रंगाचे प्रवेश अर्ज उपलब्ध असतील. अर्जासोबत ज्या त्या शाखा / माध्यमाच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांविषयी (उदा. कनिष्ठ महाविद्यालयाचा विभाग, पत्ता, कोड नंबर, मुले/मुलींचे, विषय सुविधा, वसतीगृह सोय, अनुदानित / अंशतः अनुदानित / कायम विनाअनुदानित, मंजूर तुकडया बाबत) माहिती देण्यात आलेली आहे.

५. **विद्यार्थी व पालकांना प्रवेश अर्ज भरणे सुलभ व्हावे म्हणून सन २००९-२०१० या वर्षामधील सर्व महाविद्यालयांच्या शेवटच्या प्रवेशार्थी विद्यार्थ्यांच्या इयत्ता १० वी / तत्सम परीक्षेतील गुणांची टक्केवारी दर्शविणारा तक्ता प्रवेश अर्जासोबत जोडला आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जामधील पसंतीक्रम भरताना त्यांना इयत्ता १० वी / तत्सम परीक्षेमध्ये मिळालेले गुण व आपण निवड करीत असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन २००९-२०१० या वर्षातील शेवटच्या प्रवेशार्थीचे गुण विचारात घेवून पसंतीक्रम भरताना त्याचा विचार करावा. तसेच आवेदन पत्रात तपासणी सूची (चेक लिस्ट) जोडलेली आहे. त्यानुसार आवदेन पत्र भरताना विद्यार्थ्यांनी विचार करावा. आपण निवडलेल्या निवासी विभागातील सर्व क.म.वि. सांकेतांक प्रवेश अर्जात भरणे.**

६. व्दिलक्षी अभ्याक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश समितीकडून टेबल ॲडमिशन पध्दतीने होतील, द्विलक्षी अभ्यासक्रमास मिळालेला प्रवेश म्हणजेच विज्ञान शाखेत झालेला प्रवेश द्विलक्षी अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित झाल्यावर विज्ञान शाखेचा प्रवेश अर्ज रद्द होईल.

७. केंद्रीय प्रवेश समितीने तयार केलेल्या विहित नमुन्यातील अर्जाशिवाय अन्य प्रकारचे अर्ज केंद्रीय प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

**८. अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती जोडू नयेत.**

९. एका विद्यार्थ्यांस जास्तीत जास्त दोन प्रवेश अर्ज घेता येतील. द्विलक्षी अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र अर्ज भरावयाचा असल्यास अजून एक प्रवेश अर्ज मिळू शकेल.

१०.प्रवेश अर्ज मिळविण्यासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिकेची व शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत सादर करावी लागेल. विद्यार्थ्यांस प्रवेश अर्ज मिळाल्याबद्दल मूळ शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या मागील बाजूस विक्री केंद्राचा शिक्का उमटविला जाईल. दोन वेगवेगळया शाखा / माध्यमाचे अर्ज घेतल्यास दोनदा शिक्का उमटविला जाईल. इयत्ता १० वी मार्च २०१० व त्यापूर्वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांकडे इयत्ता १० वी उत्तीर्ण झाल्याची गुणपात्रिका शाळा सोडल्याचा मूळ दाखला असेल त्यांनाच प्रवेश अर्ज मिळेल.

११.प्रवेश निश्चिती संगणकीय प्रणालीद्वारे होणार असल्याने प्रवेश अर्ज बिनचूक भरावा. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी त्यावरील शाखा / माध्यम निहाय विभागातील कनिष्ठ महाविद्यालय, कोड नंबर वगैरे सूचना विद्यार्थ्यांनी अभ्यासाव्यात बिनचूक व परिपूर्ण भरलेलेच प्रवेश अर्ज स्वीकृती केद्रावर स्वीकारले जातील. प्रवेश अर्जात खाडाखोड करु नये त्यामुळे आपले स्वतःचेच नुकसान व गैरसोय होणार आहे व त्यास केंद्रीय प्रवेश समिती जबाबदार राहणार नाही.

**१२.प्रवेश अर्जासोबत गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला अथवा जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली प्रत जोडणे आवश्यक आहे. विशेष आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (साक्षांकीत प्रत) प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्या बाहेरील व परदेशातील, तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा व्यतिरिक्त अन्य बोर्डाचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पुणे बोर्डाकडून योग्यता प्रमाणपत्र मिळविणे अनिवार्य आहे. त्यासाठी एखाद्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश निश्चित**

**झाल्यानंतरच त्याच महाविद्यालयांमार्फत आवश्यक कागदपत्रांसह बोर्डाकडे प्रस्ताव पाठवून योग्य ते प्रमाणपत्र घ्यावे लागेल. योग्यता प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच प्रवेश अंतिम होईल.**

**१३**.अर्जातील महत्वाची सूचना मधील इ. ९ वी व १० वी मध्ये सामान्य गणित हा अभ्यासक्रम असणाऱ्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी कला शाखा, वाणिज्य शाखा अथवा विज्ञान शाखेतील गणित विषय सोडून व द्विलक्षी व्यावसायिक अभ्यासक्रमातील तांत्रिक गटातील (टेक्निकल ग्रुप) सहा विषय वगळून इतर कोणतेही विषय निवडता येतील. सामान्य गणित घेतलेल्या विद्यार्थ्यांनी क.म.वि ची निवड करताना तेथे उपलब्ध असलेल्या वैकल्पिक विषयांचा पूर्ण विचार करावा.

१४.शासन निर्णय दि. २५/३/२०१० अन्वये अपंग प्रवर्गासाठी ३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. अपंग आरक्षणाच्या सवलतीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

१५.प्रवेश अर्ज सादर केल्याबद्दल स्वीकृती केद्रांकडून रीतसर पोहोच पावती घ्यावी. आपल्या प्रवेशाचा निर्णय जाहीर होईपर्यंत जपून ठेवावी.

१६. शासन पत्र क्र. एच एस सी. २००९/(१६७/०९)/उमाशि२ दि. ३१/५/२०१० आणि मा. शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे १ यांचेकडील पत्र क्र. एच. एस. सी /१५२००९/६११६९/१२एचएस दि. ४/६/२०१० नुसार सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता १० वी मध्ये एकाचवेळी सर्व विषय घेवून बसलेल्या व २ विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ए.टी.के.टी ( Allowed to Keep Terms ) ची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. ए.टी.के.टी द्वारे ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचे आहेत त्यांनी नियमित विद्यार्थ्यां बरोबरच प्रवेश अर्ज विकत घेवून दिलेल्या मुदतीत सादर करावयाचे आहेत.

**नियमित विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ए.टी.के.टी पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.**

**प्रवेशाबाबत सर्व साधारण सूचना :-**

१. शासन आदेशानुसार इयत्ता ११ वी चे प्रवेश केवळ गुणवत्तेवर आधारीत संगणकीय प्रणालीद्वारे केले जातील.

२. प्रवेशाच्या संभाव्य वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास तो प्रसिध्दी माध्यमांद्वारे जाहीर करण्यात येईल. प्रवेश याद्या जाहीर झाल्यानंतर प्रवेशाबाबत शंका / अडचणी / तक्रारी निवारण करण्यासाठी सर्व प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रे (वरील २०) हीच तक्रार निवारण केंद्रे म्हणून काम करतील.

३. विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी परीक्षेत विज्ञान विषयात किमान ४० टक्के गुण मिळविले असले पाहिजेत. अन्यथा तो विद्यार्थी विज्ञान शाखा प्रवेशास पात्र समजला जाणार नाही. (१५० पैकी ६० गुण / १०० पैकी ४० गुण)

४. मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत प्रचलित शासन धोरणानुसार प्रवेश दिले जातील व त्यासाठी संवर्गनिहाय गुणवत्ता याद्या तयार केल्या जातील.

५. पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील शाखा / माध्यम निहाय कनिष्ठ महाविद्यालय प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहे.

**प्रवेश क्षमता शैक्षणिक वर्ष २००९-२०१०**

| अ.क्रं. | शाखा | माध्यम | कनिष्ठ महाविद्यालय वर्ग संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | कला | मराठी | ८९ | ८०४० |
| २ | कला | इंग्रजी | ३१ | २९८० |
| ३ | वाणिज्य | मराठी | १२८ | १०९६० |
| ४ | वाणिज्य | इंग्रजी | १३६ | १३२२० |
| ५ | विज्ञान | इंग्रजी | २४४ | १८५३५ |
| ६ | व्दिलक्षी अभ्यासक्रम | इंग्रजी | - | ३८२५ |
| **एकूण** | | | **६२८** | **५७५६०** |

**प्रवेश क्षमता शैक्षणिक वर्ष २०१०-२०११**

| अ.क्रं. | शाखा | माध्यम | कनिष्ठ महाविद्यालय वर्ग संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | कला | मराठी | ८९ | ८०४० |
| २ | कला | इंग्रजी | ३२ | ३२२० |
| ३ | वाणिज्य | मराठी | १२८ | १०९६० |
| ४ | वाणिज्य | इंग्रजी | १५१ | १४५८० |
| ५ | विज्ञान | इंग्रजी | २५८ | १८८५५ |
| ६ | व्दिलक्षी अभ्यासक्रम | इंग्रजी | - | ४४२५ |
| **एकूण** | | | **६५८** | **६००८०** |

६. गृहविज्ञान, किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम, हिंदी माध्यम, उर्दू माध्यमाच्या व रात्र कनिष्ठ महाविद्यालयामधील प्रवेश ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर गुणवत्तेनुसार होतील. त्यासाठी केंद्रीय प्रवेश पध्दतीचा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

७. प्रवेश अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थी / पालकांची आहे. त्यामुळे विद्यार्थी विशिष्ठ संवर्गांच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्यास प्रवेश समिती जबाबदार असणार नाही.

८. प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रावर सादर करुन अर्जाची एकदा पोहोच घेतल्यानंतर पालक / विद्यार्थी यांचेकडून सादर केली जाणारी कागदपत्रे / प्रमाणपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९. प्रवेश देताना संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने कोणत्याही प्रकारे विद्यार्थी / पालक / संबंधित व्यक्तींकडून कसल्याही प्रकारची देणगी किंवा कॅपिटेशन फी घेणे सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ नुसार गुन्हा आहे. या अधिनियमाचे उल्लंघन करणा-यास किमान १ ते २ वर्षापर्यंत कारावास तसेच रु. ५०००/- पर्यंत दंड अशी शिक्षेची तरतूद आहे. शैक्षणिक संस्था / शाळा व्यवस्थापन यांनी अशा देणगीची मागणी केल्यास अथवा स्विकारल्यास त्यांच्याविरुध्द ३० दिवसांचे आत पुराव्यासह नजिकच्या पोलीस ठाण्यात संबंधितांना तक्रार नोंदविता येईल.**

१०. सर्वसाधारण शिक्षण अभ्यासक्रमातील वैकल्पिक विषयांचे प्रवेश उपलब्ध जागांच्या मर्यादेत ज्या त्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर मिळतील. मिळालेले कनिष्ठ महाविद्यालय केवळ एका विषयासाठी बदलून दुसरे कनिष्ठ महाविद्यालय दिले जाणार नाही.

११. अल्पसंख्यांकेतर व्यवस्थापन कोटयातील ५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश कनिष्ठ महाविद्यालयांनी द्यावयाचे आहेत. सदर प्रवेश संबंधित व्यवस्थापन / कनिष्ठ महाविद्यालयाने आपापल्या स्तरावर गुणवत्तेनुसार करावयाचे आहेत.

१२. एकाच संस्थेची माध्यमिक शाळा असेल व त्या शाळेला जोडून उच्च माध्यमिकचे इयत्ता ११ वी, १२ वी चे वर्ग एकाच आवारात भरत असतील तर त्या माध्यमिक शाळांतून उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ११ वी च्या वर्गांमध्ये प्रवेशाकरीता २० टक्के राखीव जागा ठेवावयाच्या आहेत. अशा जागा गुणवत्तेनुसार भरावयाच्या आहेत. सदर २० टक्के राखीव जागांतून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी केंद्रीय प्रवेश पध्दतीचा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. सदर प्रवेश प्राचार्यांनी दिलेल्या मुदतीतच पूर्ण करुन प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी केंद्रीय प्रवेश समिती कार्यालयात न चुकता सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

१३. शासनमान्य अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असणाऱ्या संस्थांना एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के प्रवेशाचे अधिकार आहेत. ज्या समाजाची अल्पसंख्याक संस्था आहे. त्या समाजातील विद्यार्थ्यांना ५० टक्के कोटयातून प्रवेश देवून उर्वरीत प्रवेश इयत्ता ११ वी केंद्रीय प्रवेश समिती मार्फत होतील. सदर कोटयांतून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनीही केंद्रीय प्रवेश पध्दतीचा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. शासन निर्णय क्रं. १०९७/१६०३/९७/उमाशि-१ दिनांक २५ जून १९९८ नुसार अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक किंवा सर्वसाधारण यापैकी एक पर्याय निवडावयाचा आहे. जर त्यांनी अल्पसंख्यांक कोटयातून प्रवेश अर्ज सादर केला असेल तर त्यांना सर्वसाधारण कोटयात प्रवेश अर्ज सादर करता येणार नाही. अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयांनी ५० टक्के दिलेले त्यांचे कोटयातील प्रवेश दिलेल्या मुदतीतच पूर्ण करुन त्याची यादी केंद्रीय प्रवेश समिती कार्यालयास सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

पुणे व पिंपरी चिंचवड शहराकरीता केंद्रीय प्रवेश समिती मार्फत प्रवेश मागणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची व्यवस्था समिती मार्फत करण्यात आली आहे. विद्यार्थी व पालकांच्या प्रवेशाबाबतच्या माहितीकरीता संपर्कासाठी दुरध्वनी क्र. ०२०-३२३४६०११, ०२०-३२३४६०१२ ची सोय उपलब्ध करण्यात आली आहे.

१४.ICSC शाखेतील विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज फक्त खालील केंद्रातच सादर करावयाचे आहेत.

१. फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ४.

२. स.प. महाविद्यालय, पुणे ३०.

३. नौरोसजी वाडिया, पुणे १.

ICSC बोर्डाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज स्वीकृती करण्याच्या उपरोक्त केंद्रावर अर्ज जमा करताना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सुचनांच्या अनुषंगाने स्वतंत्र अर्ज / संमतीपत्र देण्यात येईल. तो अर्ज / संमतीपत्र त्याने अर्जासोबत भरून देणे बंधनकारक राहील.

१५ सदर प्रसिध्दीपत्र / प्रवेशाचे संभाव्य वेळापत्रक शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे १ यांच्या www.dydepune.com या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| **( पी. पी. साबळे)**<br>**सचिव**<br>**इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे.** तथा **सहाय्यक शिक्षण संचालक, पुणे विभाग, पुणे -१** | **( डॉ. र. गो. परदेशी)**<br>**कार्याध्यक्ष**<br>**इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती,पुणे,** तथा **प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे - ४** | **( सुनिल मगर )**<br>**अध्यक्ष**<br>**इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे.** तथा **शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१** |